मंगळवार दि. २२ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक २२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालन्यात सिटी बससेवेचा श्रीगणेशा; नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला मोठा दिलासा





## रावसाहेब दानवे व आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते लोकार्पण; जालनाइंदेवाडी, जालनारामनगर आणि जालनानागेवाडी मार्गावर बस धावणार

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाचा प्रश्न अधिक सुलभ आणि सोयीचा करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले असून, शहरात अखेर सिटी बससेवेचा श्रीगणेशा झाला आहे. माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा माजी मंत्री रावसाहेब दानवे पाटील आणि शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते सिटी बससेवेचा लोकार्पण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी सिटी बससेवा सुरू करण्याची मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर जालना शहरासाठी सिटी बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कर्मचारी, व्यापारी, रुग्ण तसेच रोजच्या कामासाठी शहराच्या विविध भागांत ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

सुरुवातीच्या टप्प्यात जालना ते इंदेवाडी, जालना ते रामनगर आणि जालना ते नागेवाडी या मार्गांवर सिटी बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शहर आणि शहरालगतच्या भागांना जोडणाऱ्या या मार्गांमुळे नागरिकांना खासगी वाहनांवर अवलंबून राहण्याची गरज कमी होण्यास मदत होणार आहे. शहरातील विविध भागांमध्ये नियमित सार्वजनिक वाहतूक उपलब्ध नसल्याने अनेक नागरिकांना रिक्षा किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. त्यात वाढणारा प्रवास खर्च हा सर्वसामान्य नागरिकांसाठी मोठा प्रश्न ठरतो. या पार्श्वभूमीवर सिटी बससेवा सुरू झाल्याने तुलनेने परवडणाऱ्या दरात प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता आहे. विशेषतः विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांसाठी ही सेवा उपयुक्त ठरणार आहे. जालना शहरात सिटी बससेवा सुरू करण्यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी परिवहन विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. शहराची वाढती लोकसंख्या आणि नागरिकांच्या प्रवासाच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची आवश्यकता त्यांनी परिवहन मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिल्यानंतर सिटी बससेवेचा मार्ग मोकळा झाला. अखेर बससेवा प्रत्यक्ष सुरू झाल्याने खोतकरांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. लोकार्पण सोहळ्यात बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी नागरिकांना सिटी बससेवेचा जास्तीत जास्त लाभ मिळावा, यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचे सांगितले.

सिटी बससेवा नियमित आणि प्रभावीपणे सुरू राहणे आवश्यक आहे. नागरिकांना वेळेवर बस उपलब्ध व्हावी, प्रवास सुरक्षित आणि सोयीचा व्हावा, यासाठी संबंधित यंत्रणेशी समन्वय साधला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रवाशांना आणखी सवलती कशा देता येतील, याचाही विचार करण्यात येणार असल्याचे खोतकर यांनी स्पष्ट केले. आगामी काळात प्रवाशांची संख्या आणि नागरिकांची गरज लक्षात घेऊन अधिक बसगाड्या उपलब्ध करून देण्यासाठीही पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांनी सिटी बससेवेचे स्वागत करत ही सेवा नागरिकांसाठी महत्त्वाची ठरणार असल्याचे सांगितले. जालना शहरातील नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी सुविधा मिळावी, हा उद्देश महत्त्वाचा असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत होणे शहराच्या विकासासाठी आवश्यक असल्याचे दानवे यांनी नमूद केले.

यावेळी जालना जिल्ह्याच्या विकासाच्या मुद्द्यावर बोलताना दानवे पाटील यांनी, ''केंद्रात आपण एक आहोत, राज्यात आपण एक आहोत आणि जालना जिल्ह्यातही आपण एकत्रच आहोत,'' अशी भूमिका मांडली. जिल्ह्याच्या विकासासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रस्तावांशी आणि विचारांशी आपण सहमत असल्याचेही त्यांनी सांगितले.

लोकार्पण सोहळ्यानंतर रावसाहेब दानवे पाटील आणि आमदार अर्जुनराव खोतकर यांनी स्वतः सिटी बसमधून प्रवास करून बससेवेची पाहणी केली. दोन्ही नेत्यांनी जालना बसस्थानक ते गांधी चौक (चमन) असा बसमधून प्रवास केला. यावेळी त्यांनी बसमधील सुविधा, प्रवास व्यवस्था आणि मार्गाची माहिती घेतली. जालना आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत बससेवा सुरळीत चालविण्याबाबत चर्चा केली.

नागरिकांना नियमित, सुरक्षित आणि वेळेवर बससेवा उपलब्ध करून देणे महत्त्वाचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. बससेवेचा विस्तार शहरातील आणखी भागांमध्ये करण्याबाबतही भविष्यात विचार केला जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. सिटी बससेवा सुरू झाली असली तरी ती नियमित, वेळापत्रकानुसार आणि नागरिकांच्या गरजेनुसार चालविणे हे पुढील मोठे आव्हान राहणार आहे. केवळ लोकार्पणापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात नागरिकांना रोज बस उपलब्ध झाली पाहिजे, अशी अपेक्षा शहरवासीयांकडून व्यक्त होत आहे. बसच्या फेऱ्यांची संख्या, वेळापत्रक, थांबे, प्रवाशांची संख्या आणि मार्गांची आवश्यकता यांचा नियमित आढावा घेतल्यास सेवा अधिक प्रभावी होऊ शकते. प्रवाशांचा प्रतिसाद वाढल्यास भविष्यात आणखी मार्गांवर *(पान २ वर)*

---

जालन्यात गुन्हेगारीविरोधात संतापाचा उद्रेक; पोलिसांविरोधात धडक मोर्चा

## ‘गुन्हेगारीला आळा घाला’; घोषणांनी परिसर दणाणला

**भाजप नगरसेविका ॲड. रीमा खरात काळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा**

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील वाढती गुन्हेगारी, खून, चाकूहल्ले, दरोडे, अत्याचार तसेच अवैध धंद्यांच्या मुद्द्यावरून नागरिकांच्या संतापाचा उद्रेक सोमवारी रस्त्यावर पाहायला मिळाला. शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भाजप नगरसेविका ॲड. रीमा संदीप खरात काळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. मोठ्या संख्येने नागरिक, कार्यकर्ते तसेच विविध गुन्हेगारी




घटनांमध्ये आपले आप्त गमावलेल्या कुटुंबीयांनी या मोर्चात सहभाग घेत पोलिस प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी केली. मोर्चादरम्यान पोलिस प्रशासनाच्या कथित निष्क्रियतेविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. गुन्हेगारी प्रवृत्तींवर तातडीने आळा घालावा, सराईत गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी आणि शहरातील नागरिकांना भयमुक्त वातावरण मिळावे *(पान २ वर)*

---

## दुष्काळ जाहीर करा; गजानन उगले यांचे अन्नत्याग आंदोलन

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण; शेतकरी, कष्टकरी, व्यापारी व सामाजिक संघटनांचा वाढता पाठिंबा

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी नेते गजानन रामनाथ उगले यांनी सुरू केलेले बेमुदत अन्नत्याग आंदोलन सोमवारी सहाव्या दिवशी पोहोचले. १६ सप्टेंबर २०२६पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या या आंदोलनात मराठवाडा दुष्काळग्रस्त जाहीर करून तातडीने दुष्काळी उपाययोजना राबवाव्यात, यासह पीकविमा, कर्जमाफी, सिंचन आणि शेतमालाच्या नुकसानभरपाई




संदर्भातील विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. जालना जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसातील अनिश्चितता आणि पावसाच्या खंडाचा पिकांवर परिणाम झाल्याचे जिल्ह्याच्या प्राथमिक पीक परिस्थिती अहवालात नमूद करण्यात आले आहे. १६ सप्टेंबरपर्यंत जिल्ह्यातील एकूण पर्जन्यमान हे संबंधित कालावधीच्या सरासरीच्या सुमारे ८१ टक्के असल्याचे अहवालात नमूद आहे. त्यामुळे खरीप पिकांच्या उत्पादनाबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. ऑगस्टअखेर सुमारे सहा लाख हेक्टरवरील खरीप क्षेत्र पावसाच्या खंडामुळे धोक्यात असल्याचे वृत्तही समोर आले होते.

या पार्श्वभूमीवर उगले यांनी शासनाने परिस्थितीची तातडीने दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे. त्यांच्या आंदोलनाला जिल्ह्यातील विविध भागांतून शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तसेच राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व नेते भेट देत असल्याचे सांगण्यात आले.

उगले यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये मराठवाडा दुष्काळग्रस्त जाहीर करून तातडीने दुष्काळी उपाययोजना सुरू करणे याचा समावेश आहे. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या मदतीसाठी लागू असलेल्या आणि च्या निकषांमध्ये बदल करून प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या नुकसानीचा *(पान २ वर)*

---

## गौसन्मानार्थ जालन्यात भव्य जनजागृती रॅली
## गोमाता ही आपल्या संस्कृतीचा आधार-अक्षय गोरंट्याल

**जालना - प्रतिनिधी**

संपूर्ण देशभरात गोहत्या पूर्णतः प्रतिबंधित करून गोमातेला पूर्ण संरक्षण मिळावे, गोमातेला राष्ट्रमाता, राष्ट्र आराध्या, या सन्मानित पदाचा दर्जा प्राप्त व्हावा तसेच संपूर्ण भारतवर्षात समान गोसेवा घडण्यासाठी स्वतंत्र केंद्रीय गोसेवा मंत्रालय स्थापन करून केंद्रीय कायदा लागू करण्यात यावा, या मागण्यांसाठी श्री गणेश महासंघ, अद्विक क्लब, रोटरी क्लब ऑफ जालना इलाईट आणि इनरव्हील क्लब ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जवाहर बागपर्यंत युवा नेते अक्षय




गोरंट्याल यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य गौसन्मान अभियान जनजागृती रॅली काढण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील महाराजा अग्रेशन गणेश मंडळात आरती आणि महाराजा अग्रसेन यांच्या प्रतिमेचे पूजन करून या रॅलीचा शुभारंभ झाला. यावेळी नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, नगरसेवक संतोष माधोवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल, महासचिव भूषण यादव, कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत, उपाध्यक्ष डॉ. शिवदत्त विजयसेनानी, आनंद बंब, गौरव बोरा, माजी अध्यक्ष रोहित भुरेवाल, मार्गदर्शक बाबा नंद, युवा उद्योजक अर्जुन पित्ती, अमोल बांगड, अद्विक क्लबचे अध्यक्ष राहुल अग्रवाल, रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटच्या अध्यक्षा अनया अग्रवाल, इनरव्हील क्लब ऑफ जालनाच्या अध्यक्षा छाया अग्रवाल यांच्यासह महासंघाच्या पदाधिकारी व सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी बोलताना अक्षय गोरंट्याल म्हणाले की, गोमातेला राष्ट्रमाताचा सन्मान मिळावा, यासाठी सुरू असलेल्या स्वाक्षरी मोहिमेला सर्वांनी *(पान २ वर)*

---

## जालना जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा; मनसेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार, शेतमजूर कुटुंबांना २५ हजारांची थेट मदत द्या; - शुल्कालाही विरोध

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात मागील काही काळापासून पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली असून, शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जालना जिल्ह्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली.

मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवार, २१ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात



निवेदन सादर केले. जिल्ह्यात मागील सुमारे ६० दिवसांपासून पावसाचा मोठा खंड पडल्याने शेतकरी मेटाकुटीस आला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने परिस्थितीची तातडीने दखल घेऊन कोणत्याही अटी न ठेवता शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांना मदत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जिल्ह्यात १४ सप्टेंबरपर्यंत जूनपासून झालेला पाऊस संबंधित कालावधीच्या सरासरीच्या सुमारे ८१ टक्के झाला असल्याचे उपलब्ध वृत्तांत नमूद आहे. पावसातील खंडाचा खरीप पिकांवर परिणाम होत असल्याचेही त्यात नमूद करण्यात आले आहे.

यंदाच्या संभाव्य पीक नुकसानीची भरपाई करण्यासाठी शेतकऱ्यांना थेट हेक्टरी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मनसेने केली आहे. त्याचबरोबर ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दुष्काळाचा परिणाम होऊ नये म्हणून शेतमजूर कुटुंबांना प्रति कुटुंब २५ हजार रुपयांची विशेष मदत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

पावसाअभावी शेतीची कामे ठप्प *(पान २ वर)*

# संपादकीय...

## दुष्काळ कागदावर नको, शेताच्या बांधावर दिसला पाहिजे!

दुष्काळाची व्याख्या फक्त पावसाच्या आकड्यांत करता येत नाही. पाऊस किती पडला, यापेक्षा त्या पावसाने शेतकऱ्याच्या शेतात किती उभे केले, हा खरा प्रश्न आहे. पांगरी गोसावी येथे एका गुंठ्यात केवळ ३७० ग्रॅम उडीद उत्पादन झाल्याचे पीक कापणी प्रयोगातून समोर येत असेल, तर हा आकडा केवळ कृषी विभागाच्या नोंदीत जाणारा आकडा नाही; तो ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या गंभीर संकटाची घंटा आहे. माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना व मंठा तालुक्यातील विविध गावांचा प्रत्यक्ष दुष्काळ पाहणी दौरा केला. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची अवस्था पाहिली, महिलांकडून पाणीटंचाईच्या समस्या ऐकल्या आणि शेतकऱ्यांसोबत जमिनीवर बसून भोजन केले. राजकीय दौऱ्याच्या पलीकडे जाऊन शेतात दिसणारी परिस्थिती प्रशासनाच्या टेबलावर पोहोचणे महत्त्वाचे आहे. परंतु आता खरा प्रश्न पुढचा आहेपाहणी झाली, पुढे काय? दुष्काळ पाहणी दौरे महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन नाहीत. नेते बांधावर जातात, शेतकऱ्यांशी संवाद साधतात, छायाचित्रे प्रसिद्ध होतात, मदतीची आश्वासने दिली जातात आणि त्यानंतर फाईल प्रशासनाच्या विविध टेबलांवर फिरत राहते. शेतकरी मात्र पुढील पिकाच्या खर्चासाठी पुन्हा कर्जाच्या दारात उभा राहतो. यावेळी ही पुनरावृत्ती होऊ नये. महाराष्ट्राच्या अधिकृत दुष्काळ मूल्यांकन पद्धतीत केवळ पर्जन्यमान नव्हे, तर शेतीवरील परिणाम, पिकांची स्थिती, मृद्‌आर्द्रता आणि अन्य निर्देशकांचा विचार केला जातो. त्यामुळे 'जिल्ह्याची सरासरी पावसाची नोंद समाधानकारक आहे' एवढ्या एका आकड्याच्या आधारावर एखाद्या तालुक्यातील अथवा गावातील प्रत्यक्ष संकट झाकता कामा नये. जालना जिल्ह्याचेच उदाहरण घ्या. अधिकृत माहितीनुसार जिल्ह्यात पावसाचे वितरण सर्वत्र समान नाही. विविध तालुक्यांमध्ये पर्जन्यमानात फरक आहे आणि शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. मग प्रश्न असा आहे की सरासरीचा आकडा शेतकऱ्याच्या शेतातील वास्तवापेक्षा मोठा मानायचा की पीक कापणी प्रयोग, पिकांची अवस्था आणि पाणी उपलब्धता यांना महत्त्व द्यायचे? याचे उत्तर प्रशासनाने पारदर्शकपणे द्यायला हवे. शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य सरकारकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले गेले आहे. पीक विम्याचा लाभ मिळवून देण्याचेही सांगण्यात आले आहे. ही आश्वासने स्वागतार्ह आहेत; पण आता शेतकऱ्याला आश्वासनापेक्षा अधिकृत पंचनामा, नुकसान नोंदणी, पात्रता निश्चिती आणि प्रत्यक्ष खात्यात मदत हवी आहे. राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या माहितीनुसार नैसर्गिक आपत्तीतील पीक नुकसानीसाठी शासनाने निश्चित निकष व मदतीचे दर ठरविले आहेत आणि नुकसान नोंदणीपासून निधी वितरणापर्यंत प्रक्रिया आहे. म्हणूनच दुष्काळग्रस्त भागात सर्वेक्षण वेगाने झाले पाहिजे. कागदोपत्री अहवाल तयार करण्यापेक्षा शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती नोंदविणे आवश्यक आहे.

या दौऱ्यात माता-भगिनींनी मांडलेली पाणीटंचाईची व्यथा अधिक गंभीर आहे. पिण्याचे पाणी, जनावरांचे पाणी आणि शेतीचे पाणीया तिन्ही गरजा अपुऱ्या पडत असतील तर ग्रामीण जीवनाचा संपूर्ण समतोल बिघडतो. पाणी आणण्याची जबाबदारी प्रामुख्याने महिलांवर पडते. त्यामुळे पाणीटंचाईचा परिणाम केवळ शेतीवर होत नाही; तो कुटुंबाच्या आरोग्यावर, महिलांच्या श्रमावर आणि पशुधनाच्या अस्तित्वावरही होतो. म्हणून टँकरची मागणी आली की मंजुरीच्या फेऱ्यांत वेळ घालवण्यापेक्षा ज्या गावात प्रत्यक्ष पाणीटंचाई आहे, तेथे तातडीने पाणी पोहोचविण्याची यंत्रणा उभी राहिली पाहिजे. दुष्काळ म्हणजे फक्त पिकांचे नुकसान नाही. पिके गेली की शेतकऱ्याच्या हातात पैसा राहत नाही. पैसा नाही तर जनावरांसाठी चारा विकत घेणे कठीण होते. जनावरांना पाणी नसेल तर पशुधन संकटात येते. शेतीचे काम घटले की ग्रामीण रोजगारावरही परिणाम होतो. म्हणून दुष्काळ निवारणाची रणनीती पीक नुकसानभरपाईपुरती मर्यादित ठेवून चालणार नाही. पाणी, चारा, पशुवैद्यकीय सेवा, रोजगार, पीक विमा, पीक कर्ज आणि पुढील हंगामासाठी बियाणेया सर्व बाबींचा एकत्रित विचार करावा लागेल. महाराष्ट्राच्या आपत्ती व्यवस्थापन व्यवस्थेत दुष्काळ हा अधिसूचित नैसर्गिक आपत्तींपैकी एक आहे आणि  हा तातडीच्या मदतीसाठी उपलब्ध प्रमुख निधी आहे. दुष्काळावरून आरोप-प्रत्यारोप करण्याची वेळ नाही. कोणत्या पक्षाचा नेता शेतकऱ्यांच्या बांधावर आधी पोहोचला, यापेक्षा शासनाच्या यंत्रणेने मदत किती वेगाने पोहोचवली, हे महत्त्वाचे आहे. आमदार लोणीकर यांनी दुष्काळ जाहीर करण्यासाठी आणि मदतीसाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे. आता त्यांच्या पाठपुराव्याची खरी परीक्षा शासनाच्या निर्णयात होईल. प्रशासनानेही या मागण्यांकडे राजकीय निवेदन म्हणून न पाहता प्रत्यक्ष परिस्थितीचा प्रशासकीय अहवाल म्हणून पाहणे आवश्यक आहे. कारण शेतकऱ्याला भाषण नकोत्याला पाणी हवे आहे. शेतकऱ्याला आश्वासन नकोत्याला नुकसानभरपाई हवी आहे. शेतकऱ्याला कागदी दुष्काळ नकोत्याच्या शेतातील दुष्काळाची अधिकृत दखल हवी आहे.

आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मदतीची घोषणा झाल्यानंतर ती शेतकऱ्याच्या बँक खात्यात पोहोचेपर्यंत पाठपुरावा करणारी व्यवस्था हवी. आज ३७० ग्रॅम उडीद हा आकडा आपल्याला प्रश्न विचारतो आहे. उद्या याच शेतकऱ्याच्या घरात चुल पेटेल का, त्याचे जनावर वाचेल का, पुढील हंगामासाठी त्याच्याकडे भांडवल उरेल काया प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने आणि शासनाने द्यायची आहेत. दुष्काळ जाहीर करण्यापेक्षा दुष्काळग्रस्त माणसाला वेळेत मदत मिळणे महत्त्वाचे आहे. आता पाहणीचे फोटो पुरे झाले. आता अहवालांची भाषा पुरे झाली.

शेताच्या बांधावर उतरलेल्या संकटाला शासनाच्या निर्णयात उतरविण्याची वेळ आली आहे. कारण 'शेतकरी वाऱ्यावर सोडणार नाही' हे आश्वासन नसावे; ते शासनाच्या कृतीत दिसले पाहिजे!

# रांगोळीतून सामाजिक संदेश; सिद्धिविनायक मंडळाची स्पर्धा उत्साहात



**भोकरदन – प्रतिनिधी**

शहरातील लालगढी गल्ली येथील सिद्धिविनायक गणेश मंडळाच्या वतीने २० सप्टेंबर रोजी आयोजित भव्य रांगोळी स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध रंगांच्या रांगोळ्यांतून पाणी बचत, मोबाईलचा अतिवापर टाळणे, स्त्रीभ्रूणहत्या निर्मूलन यांसह गणेशाच्या विविध रूपांचे संदेश साकारण्यात आले. मोठ्या गटात कोमल खारोटे, मानसी शास्त्री व मंजिरी शास्त्री यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. छोट्या गटात वेदिका सराफ, भार्गवी शास्त्री व गौरी सराफ विजेत्या ठरल्या. मोठ्या गटातील विजेत्यांना श्रीकृष्ण ज्वेलर्सतर्फे बक्षीस व ट्रॉफी, तर दिवंगत सदस्य तुषार औटी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ औटी परिवारातर्फे छोट्या गटातील विजेत्यांना ट्रॉफी देण्यात आली.

पान १ व ४ वरुन...

## जालन्यात सिटी...

बससेवा सुरू करण्याची गरज निर्माण होणार आहे. शहराचा विस्तार झपाट्याने होत असल्याने सिटी बससेवेचा टप्प्याटप्प्याने विस्तार करणे आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे इंदेवाडी, रामनगर आणि नागेवाडी या प्रारंभीच्या मार्गांनंतर शहरातील इतर प्रमुख भागांनाही सार्वजनिक वाहतुकीच्या जाळ्यात जोडण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

लोकार्पणानंतर रावसाहेब दानवे आणि आमदार खोतकर यांनी जालना आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. बससेवेचे संचालन, प्रवाशांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधा आणि भविष्यातील विस्तार याबाबत माहिती घेण्यात आली. नागरिकांना चांगली सेवा मिळण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, वेळेचे नियोजन करावे आणि प्रवाशांच्या तक्रारींकडे गांभीर्याने पाहावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.  या लोकार्पण सोहळ्यास माजी आमदार अरविंद चव्हाण, शिवसेना संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, मनपा महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, नगरसेविका दर्शना झोल-खोतकर, मनपा विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक अश्विन आंबेकर, संजय डुकरे पाटील, अमोल ठाकूर, गटनेते दीपक राठोड, दिनेश भगत, योगेश भगत, दुर्गेश काठोटीवाले, विजय जाधव, शुभम टेकाळे, नितीन जांगडे यांच्यासह विविध पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच सपकाळ विभाग नियंत्रक टकले, आगार प्रमुख जैवळ, जफर खान, संतोष रासवे, स्वप्नील भास्कर, अजिंक्य जैवळ, बसस्थानक प्रमुख अनिल राठोड, सरफराज खान, शेख मुजाहेद, अभिषेक काबलिये, नजीर शेख, अच्युतराव कदम, देवेंद्र बुंदेले, धनराज बटावाले, आकाश जगताप, अंकुश पाचफुले, अमोल राऊत, मनोज लाखोले, बिलाल सौदागर, प्रवीण फुके, भगु भगत, रवींद्र देशपांडे, अशोक सांबरे, किरण शिरसाट, योगेश रत्नपारखे, विजाताई चौधरी, छायाताई कोळे, विष्णू डोंगरे, संताजी वाघमारे, राधाकिसन दाभाडे, शिवाजी शेळके, आदेश कोठेजा, पांडुरंग डोंगरे, बाळू पाचरणे, महादेव वाघ, नागेश डवले, बाळू ढगे, प्रमोद वाघमारे यांच्यासह जालना आगारातील अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जालना शहरात सिटी बससेवा सुरू झाल्यामुळे सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधेत महत्त्वाची भर पडली आहे. मात्र आता या सेवेचा नियमितपणा, वेळेचे पालन, योग्य मार्गनियोजन आणि भविष्यातील विस्तार यावर तिचे यश अवलंबून राहणार आहे.

सुरुवातीच्या तीन मार्गांवर सुरू झालेली ही सेवा भविष्यात शहरातील अधिकाधिक भागांपर्यंत पोहोचावी आणि जालना शहरासाठी सक्षम, सुरक्षित व परवडणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभी राहावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. लोकार्पण झाले; आता खरी कसोटी रोजच्या प्रवाशाला वेळेवर बस मिळते का, याचीच!

## दुष्काळ जाहीर....

विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

खरीप २०२६ चा पीकविमा मंजूर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने विमा संरक्षणाचा लाभ मिळावा, तसेच २०२४च्या खरीप हंगामातील प्रलंबित पीकविमा दावे निकाली काढावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. २०२५च्या रब्बी फळपीक विम्याबाबतही निर्णय घेण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. २०२५-२६च्या ऊस गाळप हंगामासाठी साखरेच्या वाढलेल्या भावाच्या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन एक हजार रुपये अतिरिक्त रक्कम राज्य व केंद्र सरकारने द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

जालना जिल्ह्याची प्रमुख ओळख असलेल्या मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्येकडेही आंदोलनातून लक्ष वेधण्यात आले आहे. मोसंबी बागांमध्ये फळगळतीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर हेक्टरी एक लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. जालना जिल्हा मोसंबी उत्पादनासाठी महत्त्वाचा असून, अधिकृत माहितीनुसार जिल्ह्यातील कृषी अर्थव्यवस्थेत शेतीचे मोठे योगदान आहे. दुष्काळाच्या परिस्थितीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून सिंचनाच्या सुविधांचा विस्तार करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. जिल्ह्यातील प्रलंबित व प्रस्तावित जलसिंचन प्रकल्प तातडीने पूर्ण करावेत, अस्तित्वातील प्रकल्पांची दुरुस्ती करावी आणि प्रत्येक गावासाठी स्वतंत्र जलसिंचन आराखडा तयार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच जायकवाडीच्या डाव्या व उजव्या कालव्याची तसेच संबंधित वितरिकांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी आहे. जलसिंचनासाठी उपलब्ध निधीचा अधिक प्रभावी वापर करून गावनिहाय नियोजन करण्याची मागणीही करण्यात आली आहे. शेतकरी कुटुंबांवर आर्थिक संकटाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांचे सर्व शैक्षणिक शुल्क माफ करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. २०१२ ते २०२५ या कालावधीत विविध कारणांमुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना एक लाख रुपये प्रोत्साहन रक्कम देण्यात यावी, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली आहे. जिल्ह्यात पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांबाबत चिंता व्यक्त होत असताना शेतकरी प्रश्नांवर विविध स्तरांतून शासनाचे लक्ष वेधले जात आहे. सप्टेंबरमध्येही जालना जिल्ह्यातील अत्यल्प पावसामुळे खरीप पिकांचे नुकसान झाल्याचा मुद्दा लोकप्रतिनिधींनी शासनासमोर मांडला होता. दरम्यान, गजानन उगले यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा सहावा दिवस सुरू असून आंदोलनस्थळी विविध घटकांकडून भेटी देऊन पाठिंबा व्यक्त केला जात असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, आंदोलनातील मागण्यांवर शासन आणि प्रशासनाकडून कोणती ठोस कार्यवाही होते, याकडे आता शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

## 'गुन्हेगारीला आळा...

अशा मागण्या आंदोलकांनी केल्या. मोर्चाची सुरुवात मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर आंदोलक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. पोलिस प्रशासनाच्या कारभाराचा निषेध करण्यासाठी आंदोलकांनी प्रतिकात्मक तिरडी घेऊन आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी हस्तक्षेप करून ही तिरडी ताब्यात घेतली. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये काही काळ शाब्दिक वाद आणि झटापट झाल्याचे दिसून आले. परिस्थिती वाढू नये यासाठी पोलिसांनी तत्काळ बंदोबस्त वाढविला.

मस्तगड येथून सुरू झालेला मोर्चा गांधी चमन, शनी मंदिर, नूतन वसाहत आणि अंबड चौफुली मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचला. संपूर्ण मार्गावर आंदोलकांनी विविध घोषणांद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधले.

'गुन्हेगारीला आळा घाला', 'जालना शहर भयमुक्त करा', 'गुंडांवर कठोर कारवाई करा' अशा घोषणा देण्यात आल्या. काही आंदोलकांनी पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित करत निषेध नोंदविला.

शहरात सातत्याने घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचा दावा आंदोलकांनी केला. गुन्हेगारांवर वेळेत कठोर कारवाई झाली नाही तर त्यांचे मनोबल वाढू शकते, अशी चिंता यावेळी व्यक्त करण्यात आली. जालना शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी केवळ गुन्हा दाखल करण्यापुरती कारवाई न करता सराईत आणि गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या आरोपींविरुद्ध कायद्यानुसार कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. विशेषतः पात्र प्रकरणांमध्ये मोक्का आणि एमपीडीएसारख्या कायदेशीर तरतुदींचा वापर करण्याची मागणी आंदोलकांनी केली. शहरातील अवैध धंदे, गुंडगिरी आणि संघटित स्वरूपाच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने स्वतंत्र आणि ठोस कृती आराखडा तयार करावा, अशीही मागणी करण्यात आली.

मोर्चादरम्यान आंदोलकांनी पोलिस प्रशासनाला पंधरा दिवसांचा अल्टिमेटम दिला. या कालावधीत शहरातील गुंडगिरी आणि गुन्हेगारी प्रवृत्तींवर ठोस कारवाई करण्यात आली नाही, सराईत गुन्हेगारांवर कायद्यानुसार कठोर कारवाई झाली नाही आणि शहरातील नागरिकांना भयमुक्त वातावरण मिळाले नाही, तर मुंबईतील मंत्रालयासमोर उपोषण व धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. 'जालना काय बिहार झालेला आहे?' असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला. शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पुढील टप्प्यात मंत्रालयापर्यंत आंदोलन नेण्याचा इशारा देण्यात आला. या मोर्चाचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे विविध गुन्हेगारी घटनांमध्ये आपल्या मुलांना, तरुणांना किंवा जवळच्या व्यक्तींना गमावलेल्या कुटुंबीयांचा सहभाग. हातात निषेधाचे फलक घेत पीडित कुटुंबीयांनी आपल्या न्यायाच्या मागणीसाठी आवाज उठविला. आपल्या कुटुंबावर ओढवलेली परिस्थिती भविष्यात अन्य कोणत्याही कुटुंबावर येऊ नये, यासाठी गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. गुन्हा घडल्यानंतर आरोपीला अटक करणे हीच कारवाई न राहता, प्रकरणाचा तपास वेगाने पूर्ण करून दोषींना कायद्यानुसार शिक्षा मिळवून देण्याची यंत्रणा अधिक प्रभावी करण्याची गरज असल्याचेही आंदोलकांनी सांगितले. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पोहोचल्यानंतर काही काळ वातावरण तणावपूर्ण झाले. प्रतिकात्मक तिरडी पोलिसांनी ताब्यात घेतल्याने आंदोलकांनी निषेध व्यक्त केला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. मोर्चामुळे परिसरातील वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला. पोलिसांनी आंदोलकांना समजावून सांगत परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला. जालना शहरातील गुन्हेगारीच्या मुद्द्यावरून काढण्यात आलेल्या या मोर्चामुळे पोलिस प्रशासनासमोर नागरिकांच्या अपेक्षांचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. आंदोलनकर्त्यांनी पंधरा दिवसांचा दिलेला अल्टिमेटम आणि त्यानंतर मंत्रालयासमोर आंदोलनाचा दिलेला इशारा पाहता, आता पोलिस प्रशासन गुन्हेगारी रोखण्यासाठी कोणती ठोस पावले उचलते, याकडे शहराचे लक्ष लागले आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, गंभीर गुन्ह्यांचा तपास वेगाने पूर्ण करणे, सराईत गुन्हेगारांवर कायद्यानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करणे आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे आंदोलनातून उपस्थित झालेल्या प्रश्नांना केवळ आश्वासनांनी नव्हे, तर प्रत्यक्ष कारवाईतून उत्तर मिळते का, हे येत्या काळात स्पष्ट होणार आहे.

## जालना जिल्ह्यात...

होत असल्याने ग्रामीण भागातील रोजगाराचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यात तातडीने रोजगाराची कामे सुरू करून शेतमजूर आणि ग्रामीण कुटुंबांचे स्थलांतर रोखावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच पावसाअभावी अडचणीत आलेल्या फळबागा वाचवण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दुष्काळाच्या संकटात अडकलेल्या शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढत असल्याचे मनसेने निवेदनात म्हटले आहे. गंभीर आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफीबाबत तातडीने निर्णय घ्यावा, कर्जाचे हप्ते पुनर्गठित करून शेतकऱ्यांना तातडीने नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. २०२५-२६ मध्ये पीककर्ज घेतलेल्या आणि दुष्काळग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांचाही प्रस्तावित कर्जमाफी योजनेत समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणारे प्रोत्साहन अनुदान ५० हजारांवरून एक लाख रुपये करण्यात यावे, अशी मागणी मनसेने केली आहे. दुष्काळाची तीव्रता वाढण्यापूर्वीच पाणीटंचाईग्रस्त गावांचे सर्वेक्षण करून आवश्यक त्या ठिकाणी शासकीय टँकर सुरू करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याबरोबरच पशुधनाच्या पाण्याचीही व्यवस्था करण्याची मागणी आहे. पशुधनासाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देतानाच ग्रामीण भागात पशुवैद्यकीय सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी पीकविमा योजना पूर्वीप्रमाणे एक रुपया पद्धतीने प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी मनसेने केली आहे. दुष्काळ आणि पावसाच्या खंडामुळे नुकसान झालेल्या पिकांचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून विमा संरक्षणाचा लाभ पात्र शेतकऱ्यांना मिळावा, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. शेतकरी प्रश्नांसोबतच मनसेने  व्यवहारांवरील प्रस्तावित   () बाबतही निवेदनात आक्षेप नोंदवला आहे. ऑक्टोबरपासून प्रस्तावित शुल्कामुळे व्यापारी आणि ग्राहकांवर आर्थिक परिणाम होऊ नये, तसेच हे शुल्क लागू करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. उपलब्ध माहितीनुसार, १५ ऑक्टोबर २०२६पासून ₹२,०००पेक्षा अधिक रकमेच्या काही व्यापारी  व्यवहारांवर ०.४ टक्के  लागू करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे; काही श्रेणींना सूट किंवा वेगळे दर आहेत आणि ग्राहकांकडून थेट शुल्क वसूल करू नये, असे निर्देश असल्याचे वृत्त आहे.

या पार्श्वभूमीवर डिजिटल व्यवहारांवरील शुल्काचा अतिरिक्त आर्थिक भार व्यापाऱ्यांवर पडू नये आणि त्याचा अप्रत्यक्ष परिणाम ग्राहकांवर होऊ नये, अशी मागणी मनसेने केली आहे.

जालना जिल्ह्यात पावसातील खंडामुळे खरीप पिकांच्या परिस्थितीबाबत चिंता व्यक्त होत असताना मनसेने आता कोरडा दुष्काळ जाहीर करण्याचा मुद्दा जिल्हा प्रशासनासमोर ठामपणे मांडला आहे. हेक्टरी आर्थिक मदत, शेतमजुरांना मदत, कर्जमाफी, पीककर्ज, पीकविमा, पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा-पाणी, फळबागांसाठी टँकर आणि रोजगाराच्या कामांसह - च्या प्रश्नावरही निवेदनात मागण्या करण्यात आल्या आहेत.

आता जिल्ह्यातील पावसाची प्रत्यक्ष परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि संभाव्य पाणीटंचाई यांचे प्रशासनाकडून मूल्यांकन करून त्यानुसार शासनस्तरावर कोणता निर्णय घेतला जातो, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

निवेदनावर गजानन भिने, कृष्णा खलसे, विष्णू शिंदे, मनोहर अंभोरे, कडूबा आंबोरे, रामकिशन आंबोरे, दत्ता शिंदे, ज्ञानेश्वर कातोरे, प्रकाश डुकरे, रवी सोरमारे, प्रदीप राऊत, विठ्ठल राऊत, महादेव भित्ते, कृष्णा पिसोरे, ओंकार गवळी, रोहित व्यवहारे, विशाल सोनवणे आदींच्या स्वाक्षऱ्या असल्याचे निवेदनात नमूद आहे.

## गौसन्मानार्थ जालन्यात...

अधिक व्यापक स्वरूप द्यावे. गोमाता ही आपल्या संस्कृतीचा आधार असल्याचे आहे.  जालना शहरातील युवक, विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गोप्रेमी नागरिकांनी स्वाक्षरी मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अक्षय गोरंट्याल यांनी केले.     सर्वप्रथम अनोखा गणेश मंडळात गौसन्मानार्थ स्वाक्षरीसाठी फॉर्म उपलब्ध करून देण्यात आले. त्यानंतर बडी सडक वरील मंडळांना भेटी देऊन मोहिमेची जनजागृती करण्यात आली. स्वाक्षरी अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले.

## महावीर ढाक्का...

सहकार्य केले जाईल, असे मत माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी व्यक्त केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार कैलास गोरंट्याल, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, नगरसेवक महावीर ढाक्का, बांधकाम सभापती मनोज जोशी, नगरसेवक विक्रांत ढाक्का, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, नगरसेवक रमेश गोरक्षक नगरसेवक संतोष माधववाले नगरसेवक रोहित भुरेवाल  नगरसेवक किशोर गदास, माजी नगरसेवक विजय पवार, योगेश पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी उपमहापौर राजेश राऊत म्हणाले की, प्रभाग क्रमांक ९ मधील काळुका माता मंदिराशी संबंधित ज्या काही अडचणी अथवा समस्या असतील, त्या महानगरपालिकेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. मंदिर परिसराच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. लोकार्पण सोहळ्यास आशिष चव्हाण, शंकर घोडके, राहुल परदेशी, मंगला खांडेभराड, सांडू पवार यांच्यासह काळुका माता संस्थांचे पदाधिकारी व प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## अखिल भारतीय....

तथा राष्ट्रीय संघटक प्रा.श्याम मानव यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ४४ वर्षांपासून समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवादी विचार रुजविण्यासाठी सुरू असलेल्या कार्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी जालना जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या ''बुवा तिथे बाया'' या अभियानाची माहिती देतानाच, सन १९९६ मध्ये अंबड येथील मत्स्योदरी देवीला दिल्या जाणाऱ्या रेडाबळी प्रथेच्या निर्मूलनासाठी करण्यात आलेल्या कार्याचाही त्यांनी उल्लेख केला.

**संघटना बळकटीकरणावर सकारात्मक चर्चा**

बैठकी दरम्यान महिला कार्यकारिणीची पुनर्बांधणी, युवा सहभाग वाढविणे, संघटनेचा विस्तार, कार्यकर्त्यांचे संघटन तसेच जुन्या व नव्या पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वय वाढविणे या विषयांवर सकारात्मक व सखोल चर्चा करण्यात आली.

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी महिला, युवा तसेच नव्या कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. बैठकीचे सूत्रसंचालन जिल्हा संघटक सुनिल वाघ तर कार्याध्यक्ष काकासाहेब खरात यांनी प्रस्तावने मध्ये बुवा तेथे बाबा २३ मे २०२६ रोजी अ. भा.अंनिसच्यावतीने व्याख्यानाच्या कार्यक्रमाचा जमा खर्चाचा अहवाल सभेसमोर सादर करुन त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. यावेळी बाबासाहेब कडोस, प्रेमकुमार भोसले, मारुती गायकवाड, धर्मा खिल्लारे वसंतराव खिल्लारे, बन्सी जाधव, लहू चव्हाण, अरविंद साखरे, अरुण गाढवे, एम गायकवाड, पी भोसले, रामदास उबाळे, दीपक काळे, पीजी राठोड, दत्तात्रेय उपाळे यांच्यासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या, युवा सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतावर १०० टक्के टेरिफचे सावट!

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापारविषयक आक्रमक धोरणामुळे भारत-अमेरिका संबंधांसमोर नवे आव्हान उभे राहिले आहे. रशियाकडून भारताने खनिज तेलाची खरेदी सुरू ठेवल्यास भारतीय वस्तूंवर १०० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लादण्याच्या प्रस्तावाची चर्चा सुरू झाली आहे. हा प्रस्ताव प्रत्यक्षात आल्यास भारताच्या निर्यात क्षेत्रावर, उद्योगधंद्यांवर आणि पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे या संभाव्य टेरिफकडे केवळ व्यापारविषयक निर्णय म्हणून पाहून चालणार नाही, तर त्यामागील आर्थिक आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचेही भान ठेवणे आवश्यक आहे.

भारत आणि अमेरिका हे दोन्ही देश जागतिक अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे भागीदार आहेत. गेल्या काही वर्षांत दोन्ही देशांमधील व्यापार, तंत्रज्ञान, संरक्षण, औषधनिर्मिती आणि सेवा क्षेत्रातील सहकार्य वाढले आहे. भारतासाठी अमेरिका ही मोठी निर्यात बाजारपेठ आहे, तर अमेरिकेसाठी भारत हा एक महत्त्वाचा व्यापारी भागीदार आणि मोठी ग्राहक बाजारपेठ आहे. अशा परिस्थितीत व्यापार शुल्काच्या माध्यमातून एकमेकांवर दबाव आणण्याचे धोरण दोन्ही देशांच्या दीर्घकालीन आर्थिक हितसंबंधांना बाधा पोहोचवू शकते.

अमेरिकेच्या प्रस्तावित टेरिफमागे रशियाकडून भारताने खनिज तेल खरेदी करू नये, हा प्रमुख उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाच्या आर्थिक व्यवहारांवर निर्बंध आणण्याचा अमेरिकेसह काही पाश्चिमात्य देशांचा प्रयत्न आहे. भारताने मात्र आपल्या ऊर्जा गरजा, आर्थिक हितसंबंध आणि राष्ट्रीय धोरण यांचा विचार करून रशियाकडून तेल खरेदी केली आहे. भारताची भूमिका ही कोणत्याही एका देशाच्या दबावाखाली नव्हे, तर देशाच्या व्यापक हिताचा विचार करून ठरवली गेली पाहिजे.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या आणि वेगाने विकसित होणाऱ्या देशासाठी ऊर्जा सुरक्षा हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. देशातील उद्योगधंदे, वाहतूक व्यवस्था, शेती आणि दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणावर इंधनावर अवलंबून आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ज्या देशाकडून तुलनेने किफायतशीर दरात तेल उपलब्ध होते, त्या देशाकडून तेल खरेदी करणे हा आर्थिक व्यवहाराचा भाग आहे. तेलाच्या वाढत्या किमतींचा थेट परिणाम महागाईवर होतो. इंधन महागले की वाहतूक खर्च वाढतो, वस्तूंच्या किमती वाढतात आणि त्याचा सर्वाधिक भार सामान्य नागरिकांवर पडतो. त्यामुळे भारताने आपल्या ऊर्जा गरजांचा विचार करताना केवळ बाह्य दबावापेक्षा देशांतर्गत आर्थिक परिस्थितीलाही प्राधान्य दिले पाहिजे.

दुसरीकडे, अमेरिकेच्या संभाव्य २०० टक्के टेरिफचा भारतीय निर्यातदारांना मोठा फटका बसू शकतो. भारतातून अमेरिकेत औषधे, वस्त्रोद्योगातील उत्पादने, अभियांत्रिकी वस्तू, रसायने, रत्ने आणि दागिने यांसारख्या अनेक वस्तूंची निर्यात केली जाते. आयात शुल्कात प्रचंड वाढ झाल्यास भारतीय वस्तू अमेरिकन बाजारपेठेत महाग होतील. परिणामी त्यांची मागणी कमी होण्याची शक्यता आहे. भारतीय उत्पादकांना इतर देशांच्या उत्पादकांशी स्पर्धा करताना अडचणी निर्माण होतील. निर्यात घटल्यास उद्योगांचे उत्पादन कमी होऊ शकते आणि त्याचा परिणाम रोजगारनिर्मितीवरही होऊ शकतो.

विशेषतः लघु आणि मध्यम उद्योगांसाठी अशा प्रकारचे व्यापार शुल्क मोठे संकट ठरू शकते. मोठ्या उद्योगांना काही प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करण्याची क्षमता असली, तरी मर्यादित भांडवलावर चालणाऱ्या लहान उद्योगांना बाजारपेठ गमावण्याचा धोका अधिक असतो. निर्यात ऑर्डर कमी झाल्यास कामगारांच्या रोजगारावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे १०० टक्के टेरिफची चर्चा ही केवळ केंद्र सरकार किंवा मोठ्या उद्योगांपुरती मर्यादित नसून, त्याचे पडसाद सामान्य कामगार, उद्योजक आणि त्यांच्या कुटुंबांपर्यंत पोहोचू शकतात.

मात्र, या संभाव्य संकटाचा सामना करताना भारताने घाईघाईने निर्णय घेणे योग्य ठरणार नाही. अमेरिकेच्या दबावाला बळी पडून भारताने आपल्या ऊर्जा धोरणात तातडीने बदल करावा, असेही नाही आणि अमेरिकेशी असलेले व्यापारी संबंध धोक्यात घालावेत, असेही नाही. भारताने या प्रश्नाकडे व्यावहारिक आणि दूरदृष्टीने पाहण्याची गरज आहे. राष्ट्रीय हिताचे रक्षण करतानाच आंतरराष्ट्रीय व्यापार संबंध टिकवून ठेवणे हे भारतापुढील मोठे आव्हान आहे.

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार संबंध हे केवळ एका उत्पादनाच्या आयात-निर्यातीपुरते मर्यादित नाहीत. दोन्ही देशांना एकमेकांच्या बाजारपेठांची गरज आहे. त्यामुळे व्यापार शुल्काच्या माध्यमातून दबाव वाढवण्याऐवजी चर्चेच्या माध्यमातून मतभेद सोडवणे अधिक हिताचे ठरेल. भारताने अमेरिकेसोबत राजनैतिक आणि व्यापारी पातळीवर चर्चा करून संभाव्य टेरिफचे परिणाम स्पष्ट केले पाहिजेत. भारताच्या ऊर्जा गरजा, व्यापारातील परस्परावलंबन आणि दोन्ही देशांच्या उद्योगांचे हित या बाबी चर्चेत ठामपणे मांडल्या पाहिजेत.

अमेरिकेच्या या भूमिकेमुळे भारताला आणखी एका महत्त्वाच्या बाबीचा विचार करावा लागणार आहे. ती म्हणजे निर्यातीसाठी केवळ एकाच मोठ्या बाजारपेठेवर अवलंबून राहण्याचे धोके. अमेरिका ही भारतासाठी महत्त्वाची बाजारपेठ असली, तरी युरोप, आफ्रिका, आग्नेय आशिया, पश्चिम आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील बाजारपेठांमध्येही भारतीय उत्पादनांसाठी संधी उपलब्ध आहेत. भारताने या बाजारपेठांशी व्यापार संबंध अधिक दृढ केले पाहिजेत. निर्यातीचे पर्याय वाढविल्यास एखाद्या देशाने अचानक व्यापार शुल्क वाढवले, तरी भारतीय उद्योगांना पर्यायी बाजारपेठांचा आधार मिळू शकतो. त्याचबरोबर देशांतर्गत उत्पादनाचा दर्जा, स्पर्धात्मकता आणि उत्पादन खर्च यांवरही लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. भारतीय उद्योगांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि जागतिक दर्जाची उत्पादने तयार करणे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. केंद्र सरकारनेही निर्यातदारांना आवश्यक आर्थिक मदत, धोरणात्मक स्थैर्य आणि बाजारपेठेच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला पाहिजे. भारताने स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन देणे, ऊर्जा स्रोतांमध्ये विविधता आणणे आणि पर्यायी ऊर्जा व्यवस्थांचा विकास करणे हीदेखील काळाची गरज आहे. सौरऊर्जा, पवनऊर्जा आणि अन्य पर्यायी ऊर्जा स्रोतांचा वापर वाढविल्यास भविष्यात आयात केलेल्या खनिज तेलावरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी करता येऊ शकते. मात्र, अशा बदलांसाठी दीर्घकालीन नियोजन, भरीव गुंतवणूक आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. अमेरिकेच्या टेरिफ धोरणामुळे जागतिक व्यापार व्यवस्थेपुढेही प्रश्न निर्माण होतात. व्यापार हा परस्पर सहकार्याचा आणि आर्थिक विकासाचा मार्ग असायला हवा. त्याचा वापर एखाद्या देशाला आपल्या धोरणात्मक निर्णयांपासून परावृत्त करण्यासाठी दबावाचे साधन म्हणून केला गेला, तर जागतिक व्यापारातील अनिश्चितता वाढू शकते. मोठ्या अर्थव्यवस्थांनी आपल्या आर्थिक ताकदीचा वापर करताना इतर देशांच्या सार्वभौम निर्णयक्षमतेचाही आदर केला पाहिजे. आंतरराष्ट्रीय व्यापारातील स्थैर्य हे सर्व देशांच्या हिताचे आहे.

भारताने या परिस्थितीत भावनिक प्रतिक्रिया देण्याऐवजी संयम, मुत्सद्देगिरी आणि आर्थिक दूरदृष्टी यांचा समन्वय साधला पाहिजे. अमेरिकेशी संवादाचे मार्ग खुले ठेवतानाच देशाच्या आर्थिक हिताचे संरक्षण करण्यासाठी ठोस पर्याय तयार केले पाहिजेत. संभाव्य टेरिफचा प्रत्यक्ष परिणाम किती होईल, कोणत्या उद्योगांना अधिक फटका बसेल आणि त्यावर कोणत्या उपाययोजना करता येतील, याचा सरकारने गांभीर्याने अभ्यास करणे आवश्यक आहे.

एकूणच, अमेरिकेच्या १०० टक्के टेरिफच्या संभाव्य प्रस्तावाकडे भारताने सावधगिरीने पाहण्याची गरज आहे. भारत-अमेरिका व्यापार संबंधांमध्ये तणाव वाढणे हे दोन्ही देशांसाठी हिताचे नाही. व्यापार युद्धात कोणाचाही दीर्घकालीन फायदा होत नाही; उलट त्याची किंमत उद्योग, कामगार आणि सामान्य ग्राहकांना मोजावी लागते. त्यामुळे भारताने राष्ट्रीय हिताशी तडजोड न करता संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारावा. त्याच वेळी निर्यातीचे पर्याय वाढवून, ऊर्जा सुरक्षेला बळकटी देऊन आणि स्वदेशी उद्योग अधिक सक्षम करून अशा संभाव्य आर्थिक दबावांना तोंड देण्याची तयारी ठेवावी. भारताची आर्थिक ताकद, स्वायत्त निर्णयक्षमता आणि जागतिक व्यापारातील विश्वासार्हता टिकवून ठेवणे हेच या आव्हानाला उत्तर ठरू शकते.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## भगवे वादळ वर्धापन दिन पुरस्कार सोहळा मुंबईत; ३० ऑक्टोबरपर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**मुंबई -प्रतिनिधी**

मुंबई येथील साप्ताहिक भगवे वादळच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. हा भव्य पुरस्कार सोहळा नोव्हेंबर २०२६ मध्ये मुंबई येथे मान्यवरांच्या हस्ते मोठ्या दिमाखात संपन्न होणार आहे.

साप्ताहिक भगवे वादळ परिवारातर्फे यंदा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार, प्रबोधनकार ठाकरे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, लोकमान्य अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न पुरस्कार, बहिणाबाई चौधरी साहित्यभूषण पुरस्कार, आचार्य अत्रे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार व सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर स्त्री शक्ती पुरस्कार, संत गाडगेबाबा समाजसेवा पुरस्कार, कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण महर्षी पुरस्कार, भारतरत्न लता मंगेशकर कला गौरव पुरस्कार, मेजर ध्यानचंद क्रीडा भूषण पुरस्कार, डॉ. नरेंद्र दाभोलकर निर्भय पत्रकारिता पुरस्कार, डॉ. प्रकाश आमटे आरोग्यदूत पुरस्कार आणि संत तुकाराम महाराज लोककला भूषण पुरस्कार असे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रीडा, आरोग्य, पत्रकारिता, प्रशासकीय सेवा, उद्योजकता, पर्यावरण व महिला सक्षमीकरण या विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना हे पुरस्कार दिले जाणार आहेत. इच्छुकांनी आपले संपूर्ण कार्य, माहिती, फोटो व ओळखपत्रासह प्रस्ताव दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत साप्ताहिक भगवे वादळचे संपादक दत्ता खंदारे यांच्या ९६९९३१३६२१ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावा. पात्र व्यक्तींची निवड परीक्षक मंडळामार्फत करण्यात येणार असून अधिक माहितीसाठी वरील क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन साप्ताहिक भगवे वादळ परिवारातर्फे करण्यात आले आहे.



जालना शहरातील ओळखल्या जाणाऱ्या मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ येथे श्रींची सकाळ ची महाआरती ,उद्योगपती सोहम परमार आणि निकुंज अग्रवाल यांच्या शुभहस्ते संपन्न संयकाळ ची महाआरती उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आली यावेळी मंडळाच्या वतीने त्यांचे सत्कार करताना गणपती ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आबड सोबत मंडळ समिती, महामंत्री दर्शीत आबड, उपाध्यक्ष धीरज धारीवाल, मयूर सावजी,जितेश तालुका,रमेश दलाल,संजय तालुका,अनुराग अग्रवाल,राहुल तालुका,श्याम मल्लावत सुनील अग्रवाल,श्रेणिक आबड , हितेंद्र आबड, संतोष अग्रवाल,आदी (छाया/जावेद तंबोली)

## खरीप पिकांचे सरसकट पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्या-बाळासाहेब आकात

**परतुर - प्रतिनिधी.**

परतूर, मंठा, नेर व सेवली परिसरात पावसाचा मोठा खंड पडल्याने खरीप पिकांची अवस्था अत्यंत गंभीर झाली आहे. सोयाबीन, मूग, कापूस यांसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने तातडीने खरीप पिकांचे सरसकट पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी तसेच परिसर दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी परतूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बाळासाहेब आकात यांनी केली.



आकात यांनी शिरसगाव, खांडवी, पिंप्रूळा, लिंगसा व ब्राम्हणवाडी परिसरातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी पावसाअभावी पिकांची झालेली दुरवस्था त्यांच्या निदर्शनास आली. खांडवी परिसरात नुकसान झालेला कापूस शेतकऱ्याने अक्षरशः उपटून फेकून दिल्याचे, तर दुसऱ्या ठिकाणी सोयाबीनचे पीक पूर्णपणे वाया गेल्याने शेतात बैल सोडून दिल्याचे गंभीर चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे शेतकऱ्यांचा लागवडीचा व उत्पादनाचा खर्च वाया गेला असून, कर्जफेडीचा प्रश्नही गंभीर बनला आहे. पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांसमोर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. या अस्मानी संकटातून शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळण्यासाठी शासनाने कोणतीही दिरंगाई न करता सरसकट पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, तसेच परतूर-मंठा-नेर-सेवली परिसर दुष्काळग्रस्त जाहीर करून आवश्यक सवलती व मदत द्यावी, अशी मागणी बाळासाहेब आकात यांनी केली.

यावेळी परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गणेशोत्सवातील प्रचंड गर्दीवर बालहक्क आयोगाची गंभीर दखल

## काळाचौकीतील आठ वर्षीय बालिकेच्या मृत्यूनंतर राज्यभरातील प्रमुख गणेश मंडळांच्या सुरक्षेचा आढावा; पोलिसांकडून जिल्हानिहाय अहवाल मागविला

**जालना - प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रमुख गणेश मंडळांच्या ठिकाणी होत असलेली प्रचंड गर्दी, गर्दीच्या ठिकाणी बालकांच्या सुरक्षिततेचा निर्माण झालेला प्रश्न आणि मुंबईतील काळाचौकी येथे विजेचा धक्का लागून आठ वर्षीय बालिकेचा झालेला दुर्दैवी मृत्यू याची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. आयोगाने या संपूर्ण प्रकरणाची स्वयंप्रेरणेने दखल घेत राज्यातील सर्व विशेष पोलिस महानिरीक्षक (परिक्षेत्रे) व महानगर पोलिस आयुक्त ( राज्यातील सर्व) यांची तातडीची ऑनलाइन सुनावणी आयोजित केली असून, गणेशोत्सव काळात बालकांच्या सुरक्षेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचा महानगर पालिका क्षेत्र व प्रत्येक जिल्हानिहाय सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सचिव वंदना जैन यांच्या स्वाक्षरीने २१ सप्टेंबर रोजी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना याबाबतच्या सुनावणीची नोटीस इमेल द्वारे पाठवण्यात आली आहे. बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली असून, २२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता व्हिडिओद्वारे सुनावणी होणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात मुंबई, पुण्यासह राज्यातील विविध शहरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होत आहे. मुंबईतील लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी तब्बल दहा किलोमीटरपर्यंत रांगा लागल्याचे वृत्त समोर आले आहे. पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीसह राज्यातील इतर प्रमुख गणेश मंडळांच्या ठिकाणीही दिवस-रात्र मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत आहे. या गर्दीत लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दिव्यांग व्यक्तींच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनत असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. विशेषतः काळाचौकी येथील गणेशोत्सव मंडळाच्या परिसरात अथवा दर्शनाच्या रांगेत विजेचा धक्का लागून आठ वर्षीय बालिकेचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत गंभीर असल्याचे आयोगाने म्हटले आहे. या दुर्घटनेत काही नागरिक जखमी झाल्याचाही उल्लेख नोटिशीत करण्यात आला आहे. अशा दुर्घटनांमुळे गणेशोत्सवाच्या ठिकाणी वीज व्यवस्था, सुरक्षितता आणि गर्दी व्यवस्थापनाच्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रचंड गर्दीमध्ये बालकांची चेंगराचेंगरी होणे, गुदमरल्यामुळे त्रास होणे, मुले हरवणे, उघड्या किंवा असुरक्षित विजेच्या तारांमुळे अपघात होणे, तसेच बालकांवरील लैंगिक व शारीरिक अत्याचाराचा धोका वाढण्याची शक्यता आयोगाने व्यक्त केली आहे. बालकांचे जीवन, आरोग्य आणि सुरक्षितता यांचे संरक्षण करणे ही पोलीस प्रशासनासह संबंधित यंत्रणांची वैधानिक जबाबदारी असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले आहे. काळाचौकी येथील आठ वर्षीय बालिकेच्या मृत्यूच्या प्रकरणात नोंदविण्यात आलेला गुन्हा, प्राथमिक तपासाची स्थिती आणि दुर्घटनेसाठी जबाबदार असलेल्या व्यक्ती किंवा संबंधित आयोजकांविरुद्ध करण्यात आलेली कायदेशीर कारवाई याचा सविस्तर अहवाल मुंबई पोलिसांकडून मागविण्यात आला आहे.

तसेच भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी राज्यातील प्रमुख गणेश मंडळांच्या ठिकाणी वीज व्यवस्थेची तपासणी करण्यात आली आहे का, याचीही माहिती आयोगाने मागितली आहे. लालबागचा राजा, पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपती आणि इतर अतिगर्दीच्या ठिकाणी बालके, गर्भवती महिला व स्तनदा मातांसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित दर्शन व्यवस्था करण्यात आली आहे का, याबाबतही आयोगाने माहिती मागितली आहे.

## पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी घेतला जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई व चारा उपलब्धतेचा दूरदृश्यप्रणालीद्वारे आढावा

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील सर्व जलस्रोतांची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा आणि संभाव्य वापराचे तातडीने लेखापरीक्षण करून पुढील ऑगस्टपर्यंतचा पाणीपुरवठा आराखडा तयार करावा. नागरिकांसह पशुधनासाठी पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई आणि चारा उपलब्धतेचा आढावा घेतला. यावेळी जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जालना जिल्ह्यातील धरणे, तलाव, विहिरी, लघुपाटबंधारे आणि अन्य नैसर्गिक जलस्रोतांतील पाणीसाठ्याचे लेखापरीक्षण पुढील बैठकीपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना दिले. जायकवाडी प्रकल्पातून होणाऱ्या उचल पाणीपुरवठ्याची स्थिती आणि अंबड व जालना शहरांना उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा कालावधी यांचा अचूक अंदाज घ्यावा. सध्याचा पाणीसाठा मार्चपर्यंत पुरण्याची शक्यता असली, तरी पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी उपलब्ध न झाल्यास निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा विचार करून पर्यायी नियोजन करावे, असे पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी स्पष्ट केले.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, महानगरपालिका, नगरपंचायती, मोठ्या ग्रामपंचायती तसेच दुर्गम व डोंगराळ गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे स्रोत आतापासून निश्चित करावेत. या स्रोतांतील पाणीसाठ्याचे नियमित निरीक्षण करून आवश्यकतेनुसार पर्यायी स्रोत तयार ठेवावेत. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी शेती, उद्योग, मोठी बांधकामे आणि अन्य पाणीखाऊ वापरांचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजनांचा प्रस्ताव तयार करावा. टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा पारदर्शक आणि परिणामकारक ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा. प्रत्येक टँकरला जीपीएस प्रणाली जोडून पाणी प्रत्यक्ष गरजू नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याची खात्री करावी, असे पालकमंत्री मुंडे यांनी सांगितले.

**- चारा उपलब्धतेसाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करा**

जालना जिल्ह्यातील पशुधनाची संख्या, उपलब्ध चारा आणि संभाव्य तूट यांचा समावेश असलेला स्वतंत्र चारा कृती आराखडा तयार करावा. चारा डेपो अथवा चारा छावण्यांची आवश्यकता, जिल्ह्याची चारा स्वयंपूर्णता आणि अतिरिक्त चारा मिळविण्याचे स्रोत निश्चित करावेत. शेजारील जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून तेथील चारा उपलब्धतेचा अभ्यास करावा, असेही त्यांनी निर्देशित केले. पाणी उपलब्ध असलेल्या भागांतील शेतकऱ्यांना चारा पिकांच्या लागवडीसाठी प्रोत्साहित करावे. गाळपेरा क्षेत्रांचा चारा उत्पादनासाठी उपयोग करण्याची व्यवहार्यता तपासून त्याबाबतचा निर्णय प्रस्ताव तयार करावा. चारा छावण्या अथवा अन्य उपायांसाठी राज्यस्तरीय निर्णय आणि निधीची आवश्यकता असल्यास शासनाकडे तातडीने प्रस्ताव सादर करावा, असे पालकमंत्री पालकमंत्री मुंडे यांनी सांगितले. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी आणि चारा या विषयांवर केंद्रित स्वतंत्र बैठक २८ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार आहे. या बैठकीसाठी जलस्रोतांचे लेखापरीक्षण, चारा नियोजन, संभाव्य पाणीटंचाईची गावे आणि आवश्यक उपाययोजनांची सविस्तर माहिती तयार ठेवण्याचे निर्देश पालकमंत्री मुंडे यांनी दिले.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, सर्व जलस्रोतांचे लेखापरीक्षण करून संभाव्य पाणीटंचाईची ठिकाणे निश्चित करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल. तसेच पिण्याचे पाणी व चारा उपलब्धतेवर विशेष लक्ष केंद्रित करून शेजारील जिल्ह्यांशी समन्वय साधण्यात येईल. जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक पूर्वनियोजन करून उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यातील सर्व पाण्याचे स्त्रोत शोधून त्यांची उपलब्धता व सद्यःस्थितीची माहिती संकलित करून ठेवावी. तसेच, पिक कापणी प्रयोगाच्या आधारेच शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळत असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी पिक कापणी प्रयोग गांभीर्याने व अचूकपणे पूर्ण करावेत.

# काँग्रेसला कुणीही संपवू शकत नाही : खा. कल्याण काळे

## नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सपत्नीक सत्कार; 'आता कुणीही कुठे जाणार नाही, संघटन मजबूत करा' असा कार्यकर्त्यांना संदेश

**जालना | प्रतिनिधी**

''आजकाल लोक म्हणतात की काँग्रेसचे काहीही खरं नाही. पण काँग्रेसचं काही खरं नसतं तर मी खासदार झालो असतो का? काँग्रेसला कुणीही संपवू शकत नाही,'' असे रोखठोक प्रतिपादन जालन्याचे खासदार डॉ. कल्याणराव काळे यांनी केले. काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. भाग्यनगर येथील मराठा सेवा संघाच्या माजी खासदार भाऊसाहेब देशमुख सभागृहात आयोजित या कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून नियुक्त करण्यात आलेल्या काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी पक्ष संघटन मजबूत करण्याबरोबरच आगामी काळात जिल्ह्यात काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे होते. व्यासपीठावर राजेंद्र राख, राजेंद्र गोरे, सुभाषराव कोळकर, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, डॉ. विशाल धानुरे, सुनील चौधरी, बदर चाऊस आदी उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आगामी काळात काँग्रेसने स्थानिक पातळीवर संघटन मजबूत करण्याची गरज व्यक्त केली. ''पूर्ण आमदार आणि जिल्हा परिषद अध्यक्ष तसेच पंचायत समिती अध्यक्ष हे देखील काँग्रेसचे झाले पाहिजेत,'' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. काँग्रेस कशी पुढे जाते आणि पक्ष कोणाच्या भरवशावर नाही, हे आगामी काळात दाखवून देण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. पक्षातून ज्यांना जायचे होते ते गेले आहेत; मात्र आता कुणीही कुठे जाणार नाही, त्यामुळे कार्यकर्त्यांनी चिंता करण्याची गरज नाही, असा संदेश त्यांनी यावेळी दिला. ''मग पाहा, आपले आमदार आणि खासदार कसे होत नाहीत ते!'' असे म्हणत डॉ. काळे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आपण छत्रपती संभाजीनगरमधून लोकसभा निवडणूक लढविणार असल्याची काही ठिकाणी चर्चा होत असल्याचा संदर्भ देत डॉ. काळे यांनी ही माहिती खोटी असल्याचे स्पष्ट केले.




या मुद्द्यावर बोलताना त्यांनी, ''काही जण म्हणतात की मी संभाजीनगरमधून उभं राहणार आहे; पण ते खोटं आहे,'' असे स्पष्ट केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे आगामी राजकीय चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न त्यांनी केला असल्याचे कार्यक्रमस्थळी उपस्थितांमध्ये बोलले जात होते. मात्र, भविष्यातील निवडणुकांबाबत पक्षाची अधिकृत भूमिका संबंधित वेळी स्पष्ट होणार आहे.

या सत्कार सोहळ्यास जालना जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी, बदनापूर, भोकरदन, जाफराबाद, मंठा आणि परतूर या तालुक्यांतील नवनियुक्त तालुकाध्यक्ष, सरचिटणीस, सचिव, विविध पदाधिकारी तसेच महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीनंतर त्यांचा सत्कार करून त्यांना पक्ष संघटन वाढविण्याची जबाबदारी देण्यात आली. गावपातळीपासून तालुकास्तरापर्यंत पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यावर कार्यक्रमात भर देण्यात आला. काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी केवळ पदापुरते मर्यादित न राहता कार्यकर्ते आणि नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक तालुक्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे महत्त्वाचे असल्याचे नेत्यांनी नमूद केले. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून आलेल्या पदाधिकाऱ्यांमुळे कार्यक्रमाला पक्षाच्या संघटनात्मक बैठकीचे स्वरूपही प्राप्त झाले होते. पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीनंतर झालेला हा सत्कार सोहळा काँग्रेसच्या आगामी संघटनात्मक हालचालींच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजि. राजेंद्र गोरे यांनी केले.

सुभाषराव कोळकर यांनी प्रास्ताविक केले. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी राजाभाऊ कुलकर्णी, अशोकराव उबाळे यांच्यासह जिल्हाभरातील काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला पदाधिकारी आणि नवनियुक्त पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विज्ञान शोधवाटिकेत उद्या नूतन विज्ञान वाचनालयचा शुभारंभ

## नूतनदीदी देसाई, आयुक्त अंजली शर्मा आणि खगोलशास्त्रज्ञ डॉ. रामेश्वर नाईक यांची प्रमुख उपस्थिती

**जालना - प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा आणि त्यांच्यातील संशोधक वृत्तीला चालना मिळावी, या उद्देशाने जालना एज्युकेशन फाउंडेशन संचलित विज्ञान शोधवाटिका येथे नव्याने सुरू करण्यात येत असलेल्या 'नूतन विज्ञान वाचनालया'चा उद्घाटन समारंभ बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

मामा चौकातील क्रिस्टल बिजनेस सेंटरमधील विज्ञान शोध वाटीकेत उद्घाटन सोहळा समस्त महाजनच्या विश्वस्त तथा कुंडलिका सीना रिज्युनेशन फाउंडेशनच्या अध्यक्षा नूतनदीदी देसाई यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. प्रमुख पाहुण्या म्हणून जालना शहर महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा, सहयोगी उद्योजक अक्षय अर्जुन गेही उपस्थित राहणार आहेत. परभणी ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे अध्यक्ष मा. डॉ. रामेश्वर नाईक हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करतील.

''शब्द मोजके, कृती प्रभावी'' हे ब्रीद घेऊन कार्य करणाऱ्या या ज्ञानयज्ञात विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि विज्ञानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जालना एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनिल रायठठ्ठा, उपाध्यक्ष सुरेश लाहोटी, सचिव सुरेश कुलकर्णी-केसापूरकर, विश्वस्त डॉ. हितेश रायठठ्ठा, सुनिल गोयल, गोविंद काबरा आणि दिलीप कुलकर्णी यांनी केले आहे.

# महावीर ढाक्का सामाजिक व धार्मिक कार्यात नेहमीच अग्रेसर - कैलास गोरंट्याल

## गांधी चमन येथे काळुका माता सभागृहाचा लोकार्पण सोहळा उत्साहात

**जालना | प्रतिनिधी**

जालना शहरातील गांधी चमन परिसरात असलेल्या काळुका माता संस्थानच्या सभागृहाचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी नगरसेवक महावीर ढाक्का यांच्या सामाजिक व धार्मिक कार्याचे कौतुक केले.



महावीर ढाक्का हे सामाजिक तसेच धार्मिक कार्यात नेहमीच पुढे असतात. कामका माता संस्थानच्या काही अडचणी अथवा समस्या असतील, त्या सोडविण्यासाठी *(पान २ वर)*

# जय सावता गणेश मंडळाच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दत्ता देशमुख**

गणेशोत्सवाचे औचित्य साधून जय सावता गणेश मंडळाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराचे उद्घाटन डॉ. श्रीकृष्ण जाधव, डॉ. रमेश मोठे व डॉ. अविनाश सुरुशे यांच्या हस्ते करण्यात आले.




या उपक्रमात तरुण, गणेशभक्त व मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सहभागी होत एकूण ३७ जणांनी रक्तदान केले. या शिबिरात अमोल जमधडे, विनायक डव्हळे, कृष्णा अंभोरे, ओम जमधडे, भालचंद्र मूळे, शुभम पाबळे, अनिकेत जमधडे, सोमनाथ तांबेकर, रवि खरात, परमेश्वर जाधव, जिवन मुळे, संभाजी जमधडे, पवन खांडेभराड, आशिष बारगुडे, विशाल जमधडे, शुभम डोमळे, रामेश्वर सातभाई, प्रथमेश मुणेमानिक, शुभम जमधडे, रुषिकेश गावंडे, सागर सातभाई, जय जमधडे, सौरभ खरात, समाधान पिंपळे, वैभव सातभाई, आनंद देशमाने, मनोज तांबेकर, अक्षय खरात, जयेश भिसे, आकाश जमधडे, डॉ. श्रीकृष्ण जाधव, शिवाजी जमधडे आदींनी रक्तदान केले. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व रक्तदाते व ग्रामस्थांचे आभार मानले.

# अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मुलन समितीची पुनर्गठन बैठक उत्साहात

## पुनर्बांधणीसह संघटना बळकटीकरणावर मंथन

**जालना - प्रतिनिधी**

अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जिल्हा शाखा जालना यांच्यावतीने महिला व युवा कार्यकारिणीची पुनर्बांधणी, संघटना बळकटीकरण आणि कार्याचा विस्तार या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली विशेष बैठक राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे, महिला राज्यसंघटिका श्रीमती छायाताई सावरकर, राज्य युवा संघटक पंकज वंजारे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी मराठा सेवा संघाच्या भाग्यनगर स्थित सभागृहात बैठक पार पडली. या बैठकीत अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जिल्हा कार्यकारिणीचे पुनर्गठन करुन खालीलप्रमाणे नुतन कार्यकारिणी निवडण्यात आली.




जिल्हा संघटक सुनिल वाघ, जिल्हाध्यक्ष मोहन राठोड, जिल्हाकार्याध्यक्ष काकासाहेब खरात, जिल्हासचिव प्रा.सुभाष देठे, सहसचिव बी.बी.जाधव, उपाध्यक्ष दिनकर ससाने व नंदसिंग नेणावत, कोषाध्यक्ष रघुनाथ खरात तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून सुशीलकुमार वाठोरे.

*युवा कार्यकारिणी* : जिल्हा संघटक इंजि.प्रशांत वेडेकर, सदस्य विकास खंडाळे.

*महिला कार्यकारीणी* : जिल्हाध्यक्ष सुवर्णा राऊत, बदनापूर तालुका संघटिका रुपाली साबळे, मार्गदर्शक म्हणून प्रा. बसवराज कोरे, प्रा.रावसाहेब ढवळे, संतोष गाजरे, विभावरीताई ताकट यांची सर्वानुमते निवड करण्यात

यावेळी छायाताई सावरकर, महिला राज्य संघटिका यांनी महिलांना सविस्तर मार्गदर्शन केले. महिला संघटना बांधणी, महिलांचे विविध प्रकारचे शोषण आणि अंधश्रद्धामुक्त समाजनिर्मितीमध्ये महिलांची महत्त्वपूर्ण भूमिका यावर त्यांनी प्रभावीपणे प्रकाश टाकला. महिलांनी संघटित होऊन विवेकवादी विचारांचा प्रसार करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

पंकज वंजारे, राज्य युवा संघटक यांनी युवा आघाडीची भूमिका स्पष्ट करत अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ४४ वर्षांच्या संघर्षमय व प्रेरणादायी वाटचालीचा आढावा घेतला. युवकांनी मोठ्या संख्येने या चळवळीत सहभागी होऊन विज्ञाननिष्ठ व विवेकवादी समाजनिर्मितीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

सुरेश झुरमुरे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष यांनी संस्थेच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला. संस्थापक *(पान २ वर)*

## 'इतके दिवस दारूबंदी केल्यास रुग्णालयांत रुग्णांचा महापूर येईल!'

# मुंबई उच्च न्यायालयाच्या ताशेऱ्यानंतर पुण्यात १२ दिवसांची दारूबंदी मागे; केवळ दोन दिवस 'ड्राय डे'

**जालना - प्रतिनिधी**

गणेशोत्सवादरम्यान पुणे जिल्ह्यात जाहीर करण्यात आलेली १२ दिवसांची सरसकट मद्यविक्री बंदी अखेर जिल्हा प्रशासनाला मागे घ्यावी लागली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनाच्या या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत कडक शब्दांत ताशेरे ओढल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी हा आदेश मागे घेतला. आता सुधारित आदेशानुसार केवळ गणेशोत्सवाचा पहिला दिवस (१४ सप्टेंबर) आणि विसर्जन मिरवणुकीचा दिवस (२५ सप्टेंबर) हे दोनच दिवस 'ड्राय डे' म्हणून पाळले जाणार आहेत.

'नॅशनल रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडिया विरुद्ध जिल्हाधिकारी, पुणे' (रिट याचिका क्र. १२०५३/२०२६) या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने या प्रदीर्घ बंदीवर तीव्र आक्षेप घेतला. सलग १२ दिवस दारूबंदी लागू केल्यास नियमित व व्यसनी मद्यपींना गंभीर आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागेल आणि त्यामुळे रुग्णालयांवर रुग्णांचा प्रचंड ताण येऊन ती ओसंडून वाहतील, असे थेट निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले. त्याचबरोबर मद्यपान केलेले असो वा नसो, उत्सवात कुणीही गैरकृत्य किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्यास त्यांना कठोर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा सक्त इशाराही खंडपीठाने दिला.

दारूबंदी हा उपाय नाही; अवैध व विषारी दारूचा धोका वाढतो : ॲड. महेश धनावत

या निर्णयावर प्रतिक्रिया व्यक्त करताना जालना गणेश महासंघाचे कार्याध्यक्ष ॲड. महेश धनावत यांनी न्यायालयाच्या भूमिकेचे जोरदार स्वागत केले आहे.

ते म्हणाले की, कोणत्याही गोष्टीवर सरसकट बंदी लादणे हा कधीच समस्येवरचा शाश्वत उपाय ठरू शकत नाही. गुजरात राज्यात कागदावर दारूबंदी असली तरी तिथे दारू सहजपणे उपलब्ध होते; तसेच महाराष्ट्रात गुटखा बंदी असतानाही तो सर्रास विकला जातो, हे कटू वास्तव आहे. अशा अवास्तव व प्रदीर्घ बंदीमुळे केवळ काळाबाजार, अवैध विक्री आणि विषारी किंवा जीवघेण्या दारूची तस्करी मोठ्या प्रमाणावर वाढते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने लादलेला १२ दिवसांचा बंदीचा निर्णय पूर्णपणे अव्यवहार्य होता आणि उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर घेतलेला हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह व वास्तववादी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# गणेशोत्सवाच्या माध्यमातून 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद

## अंबड येथील श्री छत्रपती गणेश मंडळ आणि पारनेर येथील रामराज्य प्रतिष्ठान गणेश मंडळ येथे लोकसंवाद संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

राज्य शासनामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या अंतर्गतच महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधत शासकीय योजना आणि उपक्रमांची माहिती पोहोचविणे हा या 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाचा उद्देश आहे.




गणेशोत्सवाचे निमित्ताने आज दि. २१ सप्टेंबर रोजी अंबड येथील छत्रपती शिवाजी महाराज हाउसिंग सोसायटी हाऊसिंग सोसायटीतील श्री छत्रपती गणेश मंडळ आणि अंबड तालुक्यातील पारनेर येथील रामराज्य प्रतिष्ठान गणेश मंडळ येथे आज लोकसंवाद-२०२६ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांच्या माध्यमातून आरोग्य, पशुसंवर्धन आणि महिला बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांनी देण्यात आली.

जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी डी. एस. बोराडे यांनी यावेळी आरोग्य विभागातील योजनांची माहिती दिली. तर महिला बाल विकास विभागाचे जिल्हा प्रकल्प समन्वय संतोष दाभाडे व जिल्हा समन्वयक आकाश भवर, तसेच पशुसंवर्धन विभागाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. एस यु तांगडे यांनी माहिती दिली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष कुणाल जाधव, मंजीत रामभाऊ गाडेकर यांच्यासह या कार्यक्रमास नागरिकांची उपस्थिती होती. सदरील लोकसंवाद कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद मिळाला तसेच नागरिकांच्या शंका निराकरण करण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.